






31/7/2021 - महाविद्यालयाच्या परिसरातील इंगळी या गावी आलेल्या पुराने गावचे पूरग्रस्त मराठी शाळा कोडोली येथे राहावयास आले, या प्रसंगी राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी स्वंसंकलित धान्य देऊन एक वेळेचे जेवणाच्या मदतीचा हात पूरग्रस्तांना दिला





दैनिक द वाळवा क्रांती

# शेंडुरे महाविद्यालयाच्या वतीने रांगोळी गावातील पूरग्रस्त नागरिकांना धान्य व शालेय साहित्याचे वाटप

**दै. वाळवा क्रांती \ रेंदाळ**

हातकणंगले तालुक्यातील हुपरी येथील रयत शिक्षण संस्थेचे चंद्राबाई शांताप्पा शेंडुरे महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने महाविद्यालय परिसरातील रांगोळी या पूरग्रस्त गावी धान्य व शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले.

पूरग्रस्तांसाठी मदतीचा एक हात या उपक्रमाअंतर्गत महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेतील काही स्वयंसेवकांनी दिलेले धान्य आणि महाविद्यालयाच्या शिक्षक आणि शिक्षकेत्तेर सेवकांनी दिलेल्या निधी संकलनातून धान्य व शालेय साहित्य यांची खरेदी करून रांगोळी तसेच मुल्लाणवाडी येथील जे आर्थिक दृष्टिकोनातून दुर्बल आहेत अशा ५० पूरग्रस्त कुटुंबीयांना गहू, तांदूळ आणि शालेय साहित्याचे वाटप महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. पी.बी. पाटील यांच्या हस्ते तसेच उपस्थित शिक्षक आणि विद्यार्थी यांच्या हस्ते करण्यात आले.

या संपूर्ण कार्यक्रमाचे संयोजन महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या कार्यक्रम अधिकारी श्रीमती संध्या माने यांनी केले.



**हातकणंगले तालुक्यातील हुपरी येथील रयत शिक्षण संस्थेचे चंद्राबाई शांताप्पा शेंडुरे महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने रांगोळी या पूरग्रस्त गावी धान्य व शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले.**

AURANGABAD Edition
Aug 21, 2021 Page No. 3
Powered by : eReleGo.com

19/8/2021 - रांगोळी येथील पूरग्रस्तांना धान्य व शालेय साहित्य वाटप करताना महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.पी.बी. पाटील आणि राष्ट्रीय सेवा योजनेच्या कार्यक्रमात अधिकारी श्रीमती संध्या माने आणि उपस्थित प्राध्यापक आणि स्वयंसेवक